Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 09 February 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ०९ फेब्रुवारी २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

दिल्ली विधानसभेत मोठा विजय मिळविल्यानंतर भारतीय जनता पक्षामध्ये मुख्यमंत्री पदाचे नाव निश्चित करण्यासाठी हालचालींना वेग आला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या निवासस्थानी आज महत्त्वपूर्ण बैठक बोलावण्यात आली आहे. भाजपाध्यक्ष जे.पी. नड्डा, दिल्ली भाजप अध्यक्ष विरेंद्र सचदेवा यांच्यासह भाजपचे अन्य काही महत्त्वाचे नेते या बैठकीला उपस्थित राहतील. दिल्ली विधानसभा निवडणुकीचे निकाल काल जाहीर झाले. त्यात भाजपला ४८ तर आम आदमी पक्षाला अवघ्या २२ जागा मिळाल्या.

****

दिल्ली विधानसभा निवडणुकीत काल सत्तारुढ आम आदमी पार्टीला दारुण पराभवाचा सामना करावा लागला. विद्यमान मुख्यमंत्री आतिशी मार्लेना यांनी त्यांच्या मतदारसंघात विजय मिळविला असला तरी त्यांच्या पक्षाच्या सर्वच दिग्गज उमेदवारांना पराभवाचा सामना करावा लागला. त्यानंतर आज सकाळी आतिशी यांनी आपण मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देणार असल्याचं सांगितलं. थोड्याच वेळात त्या दिल्लीचे उपराज्यपाल सक्सेना यांची भेट घेऊन त्यांच्याकडे आपल्या पदाचा राजीनामा सुपूर्द करतील.

****

नवीन आयकर विधेयक या आठवड्यात संसदेत सादर करणार असल्याचं अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी आज पत्रकारांशी बोलताना सांगितलं. संसदेत हे विधेयक सादर केल्यानंतर ते संसदीय समितीकडे पाठविलं जाईल. संसदीय समितीनं मंजुरी दिल्यानंतर या विधेयकाला मंत्रीमंडळाची मंजुरी घेतली जाईल, असंही त्यांनी स्पष्ट केलं. याआधीचे आयकर विधेयक सहा दशकांपूर्वी मंजूर होऊन त्याचे कायद्यात रुपांतर झाले होते. त्याची जागा आता हे आगामी विधेयक घेईल.

****

इन्शुरन्स मार्केट, पेन्शन मार्केट आणि शेअर इकॉनमी आपल्या देशाच्या आर्थिक विकासाचे तीन महत्त्वपूर्ण पैलू असल्याचं प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलं आहे. आज नागपूर इथं 'अमृतकाल: विकसीत भारत २०४७' या गुंतवणूकदार प्रशिक्षण परिषदेच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. आर्थिक वाढीसाठी आर्थिक साक्षरता महत्वाची असून यासाठी जागृती करण्याची आवश्यकता असल्याचं गडकरी म्हणाले.

****

दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांनी उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जावं आणि प्रामाणिक प्रयत्नांमधून यश संपादन करावे, असं आवाहन राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केलं आहे. तसंच भयमुक्त-कॉपीमुक्त परीक्षा या संकल्पनेला बळ देण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असंही त्यांनी म्हटलं आहे. बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारीपासून आणि इयत्ता दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारीपासून सुरु होत आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर इथं काल दोन दिवसीय ४५ व्या पुष्प प्रदर्शनाचं उद्घाटन झालं. महाराष्ट्र शासन, उपवने, उद्याने आणि सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभागाच्या वतीनं हे प्रदर्शन भरवण्यात आलं आहे. प्रदर्शनाला भेट देण्याचं आवाहन विभागाचे सहायक संचालक जे.व्ही चौगुले यांनी केलं आहे.

****

जालना कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विक्रीस येणाऱ्या मोसंबीच्या दरात वाढ झाली आहे. काल झालेल्या लिलावात मोसंबीला प्रतिटन १८ हजार रुपये दर मिळाला. जालना बाजार समितीमध्ये दररोज अडीचशे ते ३०० टन मोसंबी विक्रीस येत असून दरात आणखी वाढ होण्याची शक्यता, जालना जिल्हा मोसंबी अडतिया संघटनेचे अध्यक्ष नाथा पाटील घनघाव यांनी आकाशवाणीशी बोलताना व्यक्त केली.

****

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्राने पदकांची शंभरी पार केली आहे. महाराष्ट्राकडे सर्वाधिक ११३ पदकं असून, त्यात २५ सुवर्ण, ४२ रौप्य आणि ४६ कांस्य पदकांचा समावेश आहे. महिला मुष्टियुद्धात दिव्या पवारनं ४५ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावलं. महिलांच्या सांघिक टेनिसच्या

अंतिम फेरीत, महाराष्ट्राने गुजरातवर विजय मिळवत सुवर्णपदक जिंकलं, तर पुरुषांच्या सांघिक स्पर्धेत, तामिळनाडूनं कर्नाटकला हरवून अव्वल स्थान पटकावलं. या स्पर्धेत परभणी जिल्हा ॲथलेटीक्स संघटनेचा खेळाडू किरण मात्रे याने १० हजार मीटर धावण्याच्या स्पर्धेत रौप्यपदक पटकावलं. किरण हा परभणी तालुक्यातल्या त्रिधारावाडी इथला रहिवासी असून सध्या सेनादलात कार्यरत आहे.

****

भारत आणि इंग्लंड यांच्यात एक दिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना आज ओडिशात कटक इथं होत आहे. तीन सामन्यांच्या या मालिकेत पहिला सामना जिंकून भारत एक – शून्यने आघाडीवर आहे.

****

मराठवाडा साहित्य परिषदेच्या स्वागत उपक्रमात काल ज्येष्ठ पत्रकार तथा लेखक श्रीकांत सराफ तसंच लेखक माणिक पुरी यांचं व्याख्यान झालं, सराफ यांनी आपल्या तितरबितर या पुस्तकाबद्दल तर पुरी यांनी पक्षी येती अंगणी या पुस्तकाबद्दल मनोगत व्यक्त केलं.

****

लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीनं काँग्रेस भवनसमोर अमेरिका आणि भारत सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करत निदर्शने करण्यात आली. अमेरिकेच्या अमानवीय कृती आणि केंद्र सरकारच्या निष्क्रियतेविरोधात ही निदर्शने करण्यात आली. या प्रकरणी परराष्ट्र मंत्रालयाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी यावेळी आंदोलकांनी केली.

****

वैद्यकीय महाविद्यालयातील सर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेण्यात येणारी नीट–युजी परीक्षा येत्या ४ मे रोजी घेण्यात येणार असल्याचं राष्ट्रीय परीक्षा संस्था एनटीए नं जाहीर केलं आहे. या परीक्षेसाठी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून ती ७ मार्चपर्यंत चालणार आहे.

****